# नगरविकास विभाग

## १.सीआर/३४/ठाणे/१५

तक्रारदार यांच्या मौजे कान्हार्ले, ता. मुरबाड येथील जमिनीचा अंतिम आखणी केलेला प्लॅन मंजूर करण्यासाठी आलोसे पांडुरंग बाबुराव शेळके, सहायक नगररचनाकार, सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग ठाणे यांचे कार्यालय यांनी त्यांचेकडे एकूण रु.७०,०००/— ची मागणी केली असुन त्यापैकी सन २०१४ मध्ये रु.३०,०००/— व दिनांक ७/१/२०१५ रोजी रु.१०,०००/— स्विकारलेले असल्याचे नमूद करुन लोकसेवक शेळके यांनी आणखी रु.१०,०००/— लाचेची मागणी करित असल्याने दिनांक ८/१/२०१५ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक शेळके यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या जमिनीचा प्लॅन मंजूर करुन देण्यासाठी एकूण रु.७०,०००/—ची मागणी करुन त्यापैकी सन २०१४ मध्ये रु.३०,०००/— व दिनांक ७/१/२०१५ रोजी १०,०००/— रुपये स्विकारल्याचे कबूल करुन आणखी रु. ४०,०००/— मागणी करुन तडजोडी अंती रु.१०,०००/— स्विकारण्याचे कबुल केले. त्यावरुन दिनांक ९/१/२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे तिसऱ्या मजल्यावर असलेल्या सहायक संचालक, नगररचना विभाग यांचे कार्यालयात सापळा आयोजित केला असता श्री. पांडुरंग बाबुराव शेळके, सहायक नगररचनाकार ठाणे यांनी पंच साक्षीदारां समक्ष तक्रारदार यांचेकडून त्यांचे जमिनीचा प्लॅन मंजूर करण्यासाठी रु. १०,०००/— लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्यावरुन आरोपी लोकसेवक पांडुरंग बाबुराव शेळके, सहाय्यक नगर रचनाकार ठाणे यांचे विरुध्द ठाणे नगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. II ०२/२०१५ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १३ (१) (ड) सह १३(२) अन्वये दिनांक ९/१/२०१५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्ह्यमध्ये अटक करण्यात आली आहे.